म. प्र. नि. मंडळ
स. स. विभाग
आवक नं. 100324 / 0437
दिनांक 24/3/10
सायन, मुंबई-२२

# महाराष्ट्र शासन

☎ २२८५ २६९६
📠 २२०२ ५९४६

क्र. बैठक-२०१०/प्रक्र. १७ /तां. क. २,
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ /३/२०१०.

प्रति
श्री. हंसराज गंगाराम अहिर,
लोकसभा सदस्य,
३२, मीना बाग, नवी दिल्ली,
बजाज वॉर्ड, चंद्रपूर ४४२ ४०२.

श्री. नानाजी सितराम शामकुळे,
प्लॉट नं. २, अशोक कॉलनी,
पो. खांबला, नागपूर २५.

सचिव,
पर्यावरण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

प्रधान सचिव (उद्योग), तथा पालक सचिव,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई.

श्री. सुधीर मुनगंटीवार,
विधानसभा सदस्य,
चंद्रपूर

श्री. जैनुद्दीन झवेरी,
आमदार

मुख्य कार्यकारी अधिकारी,
म्हाडा, नागपूर.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
म्हाडा, वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०० ०३२

चीफ जनरल मॅनेजर,
चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशन.

श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे,
रा. पेठ, वॉर्ड क्र. ३, राजुरा,
ता. राजुरा- जि. चंद्रपूर.

मॅनेजिंग डायरेक्टर,
वेस्टर्न कोल फिल्डस लि.
नागपूर.

विषय : चंद्रपूर जिल्ह्यामधील प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत बैठकीचे इतिवृत्त

महोदय,

चंद्रपूर जिल्ह्यामधील प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना बाबत दि. २२/३/१० रोजी मा. राज्यमंत्री (पर्या) यांचे समवेत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,
(दि. भा. सोनवणे)
अवर सचिव

RO(HQ-II)

Imp.
24/3

**चंद्रपूर जिल्हयामधील प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनाबाबत**
**दि. २२/२/२०१० रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

मा. राज्यमंत्री पर्यावरण यांनी दि. २२/२/२०१० रोजी चंद्रपूर जिल्हयामधील प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाय योजनाबाबत घेतलेल्या बैठकीत उपस्थितांची यादी स्वतंत्ररित्या जोडली आहे.

२. बैठकीमध्ये मा. खासदार हंसराज अहिर, आमदार जैनुद्दीन झवेरी व आमदार नाना शामकुळे यांनी चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर पेपर मिल, सुपर चंद्रपूर थर्मल पावर स्टेशन, कोल वॉशरीज, वेस्टर्न कोल लि. च्या कोळसाच्या, स्पॉंज आयर्न उद्योग इत्यादीमुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत मा. राज्यमंत्री (पर्या) व उपस्थितांचे लक्ष वेधले. मा. खासदार व आमदारांनी उपस्थित केलेल्या प्रदूषणाच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी खालील प्रमाणे ठरविण्यात आले.

i. चंद्रपूर शहरात ठिकठिकाणी असलेल्या कोल डेपोमधून होणाऱ्या कोळशाच्या किरकोळ विक्रिमुळे व या कोळशाचा इंधनासाठी होणाऱ्या वापरामुळे फार मोठया प्रमाणात हवा प्रदूषण होत आहे. त्याचे निवारण करण्यासाठी मे. डब्ल्यू सिएल यांनी प्रस्तुत कोल डेपोचे परवाने त्वरीत रद्द करावे त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी चंद्रपूर शहरातील अनधिकृत कोल डेपोवर त्वरीत कारवाई करुन किरकोळ कोळशाच्या विक्रिवर बंदी घालावी.

ii. चंद्रपूर लगत चंद्रपूर, वणी, बल्लारपूर, घुग्गुस येथे कोळशाच्या वाहतूकीसाठी रेल्वे स्लाईडींग आहेत व या स्लईडिंग मध्ये कोळश्याची आवक जावक होताना मोठया प्रमाणावर धुळीकणाचे प्रदूषण होते या प्रदूषणाचे निवारण करणेसाठी मा. खासदार रेल्वे मंत्रालयासोबत बोलणी करत असून वेस्टर्न कोल लि. यांनी रेल्वे स्लाईडिंग सेवा सरळ खाणीपर्यंत वाढविता येईल का ? ही बाब तपासून पहावी.

iii. खाणीमध्ये खाणकाम करण्यापुर्वी काढण्यात येणारे मातीचे ढिग साठवितांना नदी किनाऱ्यावर ढिग साठवू नये. या मातीच्या ढिगांपासून नदी किंवा नाल्यांमध्ये होणारी भरणी टाळण्यासाठी या ढिगांच्या साठवणूकीसाठी आकृती व नकाशे तयार करुन जलसंपदा विभागाची मान्यता घ्यावी.

iv. इमठा खदाण हे द्रुतगती मार्गावर खाणकाम केलेले कच्चा माल साठविल्यामुळे या ठिकाणावरुन खाण कामाच्या मालाची ने-आण करत असल्यामुळे होणारे हवा प्रदूषण टाळण्यासाठी मप्रनि मंडळाने त्वरीत कारवाई करावी. तसेच मल्टी ऑर्गेनिक या कंपनीच्या होणाऱ्या प्रदूषणाबाबत तपासणी करुन त्वरीत कारवाई करावी.

v. चंद्रपूर जिल्हयातील प्रमुख उद्योगांकडे असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण यंत्रणेचे ऑन लाईन मॉनिटरींग करणेबाबत मप्रनि मंडळाने त्वरीत कारवाई करावी जेणेकरुन प्रदूषण नियंत्रण यंत्रणा पुर्णवेळ चालविण्यात येतील. तसेच प्रदूषणाच्या होणाऱ्या उत्सर्जनाबाबत नेमकी वस्तुस्थिती कळू शकेल.

vi. कोळशाच्या व इतर उद्योगांच्या ट्रकद्वारे होणारी वाहतूकीमुळे रस्त्याची स्थिती बिघडत असून रस्त्यावरील धुळीचे प्रदूषण वाढत आहे. त्याचे निवारण करणेसाठी पहिल्या टप्प्यामध्ये खाणीपासून ३ किमी. अंतरापर्यंत कोळसा कन्व्हेअर बेल्ट द्वारे वाहतूक करता येईल का ही बाब डब्ल्यू सी एल यांनी तपासून पहावी.

vii. खाणकाम क्षेत्रामध्ये तसेच रस्त्यांच्या बाजूला झाडांची लागवड करण्यासाठी कुठल्या प्रकारची झाडे लावणे योग्य होतील जेणेकरुन झाडांची वाढ योग्य प्रमाणात होऊन धुळीचे प्रदूषण कमी करण्यास मदत होईल, यासाठी मे. निरी, नागपूर या संस्थेचे मार्गदर्शन डब्ल्यु सी एल ने घ्यावे.

viii. खाणकाम उद्योगाकडून पर्यावरण सुधारणासाठी जमा करण्यात आलेल्या निधीतून स्थानिक समित्यांच्या सूचनेनुसार पर्यावरण सुधारणा कार्यक्रम डब्ल्यु सी एल लि. यांनी हाती घ्यावा. या कार्यक्रमामध्ये नवीन रस्त्यांचे बांधकाम, अस्तित्वातील रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल, रस्त्यांच्या बाजूचे गटारे इ. समावेश असावा.

ix. चंद्रपूर जिल्हयातील कोल वॉशरीज राज्यांच्या बाहेरील पावर प्रकल्पांना कोळसा पुरवित असल्यास त्याबाबत त्वरीत कार्यवाही करुन महाराष्ट्रातील प्रकल्पांनाच कोल वॉशरीजनी कोळसा पुरवावा व बाहेरच्या राज्यात होणारा कोळसा पुरवठा बंद करता येईल का ही बाब तपासून पहावी.

x. डब्ल्यु सी एल च्या खाणकामामुळे बाधित क्षेत्रातील ग्रामस्थांना पाणीपुरवठा डब्ल्यु सी एल या उद्योगाने करण्याबाबत तपासणी करावी.

xi. चंद्रपूर जिल्हयामध्ये नवीन पावर प्रकल्पांना परवानगी देण्यात येऊ नये व ज्या प्रकल्पांना शासनाने मान्यता दिलेली आहे. अशा प्रकल्पांकडे सक्षम प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात आले किंवा कसे हि बाब मप्रनि मंडळाने तपासून घ्यावी.

उपस्थित मान्यवरांचे आभार मानून बैठक संपल्याचे मा. राज्यमंत्री (पर्या) यांनी जाहीर केले.

*****************

चंद्रपूर जिल्हयामधील प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनाबाबत
दि. २२/२/२०१० रोजी संपन्न झालेल्या बैठकीस उपस्थितांची यादी

| क्र | नाव व पदनाम |
|---|---|
| १ | मा. खासदार हंसराज अहिर |
| २ | मा. आमदार नाना शामकुळे |
| ३ | मा. आमदार जैनुद्दीन झवेरी |
| ४ | श्रीमती. वल्सा आर नायर सिंह, सचिव पर्यावरण विभाग, मंत्रालय |
| ५ | श्री. महेश पाठक, सदस्य सचिव, मप्रनि |
| ६ | श्री. ग.नि.वराडे, संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय |
| ७ | श्री. के.बी कदम. उपसचिव उद्योग विभाग, मंत्रालय |
| ८ | श्री. ओम प्रकाश, डायरेक्टर WCL Nagpur |
| ९ | श्री. के. एम. चिरुटकर, प्रकाशगड |
| १० | श्री. जी.एम. जोशी, कार्यकारी अधिकारी, म्हाडा, नागपूर |
| ११ | श्री. एस.बी. देशपांडे म्हाडा |
| १२ | श्री. सचिन वाझलवार, लेक्चरर CBSS, NGO |
| १३ | श्री. सुरेश चोपणे, अध्यक्ष ग्रीन प्लानेट, NGO |
| १४ | डॉ. योगेश्वर य. दुधपाचरे, चंद्रपूर बचाव समिती |
| १५ | श्री.नितीन ह. बनसोड, भ.वि. जनआंदोलन |
| १६ | श्री. अजय देशपांडे, प्रा.अ. मप्रनि |
| १७ | श्री. के. चक्रवर्ती, WCL Nagpur |
| १८ | श्री. एस. डी. अस्कमवार, S.E. CSTPS चंद्रपूर |
| १९ | श्री. आर.डी.चिवाणे, केमिस्ट CSTPS चंद्रपूर |